# <u>इशरत जहां चार्ज शीट</u>

अरुण जेटली
विरोधी पक्षनेते(राज्यसभा)

4 जून,2013 रोजी मी "काय सीबीआयला आयबी ची कलई काढली पाहिजे" या विषयावर ध्यान आकर्षित करुन विस्तृत टिप्पणी केली होती. भारताच्या आंतरिक सुरक्षेला सीमेपलिकडून सुरु असलेल्या कारवाया तसेच स्थानिक मॉड्यूल मुळे अनेक आव्हाने मिळत आहत. जिहादी दहशतवाद ते माओवादी विद्रोही कारवायांमुळे आपल्याला सतत आव्हानांचा सामना करावा लागत आहे. या आव्हानांमध्ये गुप्त आणि प्रत्युत्तरादाखल केलेल्या विद्रोही कारवाया प्रमुख आहेत. यात सूचनांना एकत्र करणे आणि त्यांचा प्रसार , त्यांना पूढे जाण्यास रोखणे, विद्रोही मॉड्यूल मध्ये घुसखोरी, अनुमोकांना वित्तीय प्रलोभन आणि अशा मॉड्युल ना नष्ट करणे शामिल आहे. आपल्या गुप्तहेर एजंसीला अत्यंत गोपनीयतेने हे कार्य तडीस नेले पाहिजे. गोपनीय कारवाया केल्या जातात मात्र त्यांना स्वीकार केले जात नाही. त्यांच्यापैकी खुप कार्य वैधानिक कायद्याच्या साहाय्याशिवाय केले जाते, कारण भारतातील गुप्तहेर एजंसीज सरकारच्या आंतरिक प्रक्रियांच्या आधारावर काम करते. असे मोठ्या सार्वजनिक आणि राष्ट्रीय हिताच्या कारणामुळे होते. अपेक्षा आहे की, लोकशाहीच्या परिपक्व होण्याबरोबरच या कार्यांना कायद्याच्या रचनेच्या आत आणले जाऊ शकते आणि यानंतर सीमित संसदीय चौकशीचा विषय होतो.

गुप्तहेर एजंसिजना दहशतवादी मॉड्युलची प्रस्तावित कारवाई बद्दल माहिती मिळाली, ज्याची इशरत जहां एक हिस्सा होती. या सूचनेला परिष्कृत केले गेले आणि त्याचा प्रसार केला गेला. मॉड्युल नष्ट करण्यात आले आणि त्याच्या कारवायांना विफल करण्यात आले. इशरत लष्कर-ए-तैय्यबा(एलईटी) चा हिस्सा होती, हे जमात-उद-दावा द्वारे देण्यात आलेल्या पुराव्यांवरुन समजते, ज्याचा लाहौर मधून गजवा टाईम्स च्या माध्यमातून त्यांनी दावा केला होता की, त्यांची कार्यकर्ती मारली गेली आहे. तसेच एफबीआय आणि एनआयए द्वारे चौकशीतून डेविड हेडली ने कारवाई ची गोष्ट स्वीकार केली होती. या तथ्याबाबत आणखी माहिती मागितल्यावर भारतातील अमेरिकी दूतावासातील कायदेविषयक अताशे यांनी गुप्तचर ब्युरोसाठी एक दस्तऐवज जारी केला होता.

जेव्हा इशरत जहां आणि तिच्या सहका-यांची कथित चकमक झाली, युपिए-1 सत्तेत होती. तिच्या आई-वडीलांकडून गुजरात उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या एक जनहित याचिकेत, केंद्र सरकारने स्पष्ट पणे सांगितले होते की, इशरत एलईटी ची गुप्तहेर होती आणि 15 जून,2004 ची कथित चकमक योग्य होती. ही त्यावेळची गोष्ट आहे जेव्हा शिवराज पाटील गृहमंत्री होते. गृह मंत्रालयात बदल करण्यात आल्यानंतर सरकारचे मत ही बदलले. नव्या गृहमंत्र्यांच्या रुपातून श्री पी.चिदंबरम यांच्या देखरेखीखाली गृहमंत्रालयाने आपल्या आरोपपत्रात या चकमकीतून आपले हात झटकण्याचा प्रयत्न केला. आता त्यांनी या कारवाईची चौकशी करण्यासाठी याचिकाकर्त्यांबरोबर सहयोग करणे सुरु केले. राजनैतिक संस्थांना अपेक्षा होती कारण त्यांचे अनेक प्रयत्न विफल झाले होते, कदाचीत त्यांच्या या प्रकरणाच्या चौकशीमुळे गुजरात सरकारमधील राजकीय नेत्यांना फसवले जाऊ शकत होते.

न्यायालयाद्वारे स्थापित विशेष चौकशी पथक(एसआयटी) द्वारे चौकशीनंतर या प्रकरणाला चौकशीसाठी सीबीआयकडे सुपुर्द केले. चौकशीशी संबंधित अधिका-यांपैकी एका व्यक्तीची निवड इशरत च्या आई-वडिलांनी केले होते जे याचिकाकर्ते होते. एसआयटी मध्ये तीन लोक शामिल होते, यापैकी एक याचिकाकर्त्यांनी मनोनीत केले होते. एफआयआर मध्ये ज्या पोलिसांचे नाव होते त्यांच्यापैकी गुजरात पोलिसांच्या अनेक पोलिसकर्मींना अटक करण्यात आली होती. त्यांच्याशी समझोता बातचीत झाली होती आणि राजकीय सौदेबाजी होणार होती. 90 दिवसाच्या आत त्यांच्याविरोधात चार्जशीट दाखल न झाल्याकारणास्तव ते जामिनावर सुटले होते. ज्या लोकांना साक्षीदार होण्याचा निर्णय घेतला होता त्यांना वचन देण्यात आले की त्यांचे नाव चार्जशीट मधून हटविण्यात येईल, यांपैकी काही त्यावेळी उपस्थित होते जेव्हा ही घटना घडली. त्यांची आपली जबानी त्यांना फसवते आणि ते ना आरोपी आहेत आणि ना अनुमोदक, ते फक्त साक्षीदार होते. आरोपी म्हणून पहिल्या आणि दूस-या चार्जशीट मधून त्यांची नावे हटविण्यात आले होते. अशी प्रक्रिया कायद्यात बघायला मिळत नाही. या लोकांची जबानी सीआरपीसी ची धारा 164 च्या अंतर्गत अहमदाबाद मध्ये नाही तर मुंबईच्या न्यायालयात दाखल करण्यात आली. कोणत्या सहआरोपीच्या विरोधात एक आरोपी साक्षीदार बनू शकत नाही. तो केवळ अनुमोदक होऊ शकतो. गोळीबाराच्या दरम्यान जी लोक उपस्थित होती त्यांची नावे आरोपींच्या सूचीतून हटविण्यात आली कारण ते त्या अन्य लोकांना फसवू

शकतील जे गोळीबाराच्या दरम्यान उपस्थित सुद्धा नव्हते.
गुजरातच्या राजकीय नेत्यांना फसविण्यासाठी एक कमजोर प्रयत्न केला गेला. नाराजी आता आयबी च्या दीशेने सरकली. ज्या लोकांकडे पुरावे जमवणे, मॉड्युल नष्ट करणे, आरोपींची चौकशी करणे यांसारखी जबाबदारी होती त्यांना फसवण्याचा प्रयत्न केला गेला. दहशतवाद्याच्या ओळख पत्र नष्ट करण्याचा प्रयत्न केला गेला. दूसरी चार्जशीट आता न्यायालयात दाखल करण्यात आली.

कथित चकमकीच्या वेळी युपीए-1 सत्तेत होती. स्पष्ट स्वरुपात गुजरातच्या राजकीय नेत्यांच्या विरोधात कोणताही पुरावा नाही. केंद्रीय गुप्तचर ब्यूरो ची गुप्त कारवाईने प्रकरणाला दंडात्मक कायदा चौकशीचा विषय बनविला. आयबीच्या सूचनेचा स्त्रोत, सूचनेचा खरेपणा, सूचनेचा प्रसार, मॉड्युल ला नष्ट करण्याचा प्रकार, पीडितांबरोबरची चौकशी, मॉड्युल ला नष्ट करण्यासाठी सैन्य संचालन सहायता दंडात्मक कायद्याच्या खटल्याचा विषय होऊ शकतो. 2009 चे गृहमंत्री यांनी नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांना फसवण्यासाठी हे काम हाती घेतले. त्यांनी शेवटी आयबी ला फसविले, युपिए सरकारची एजेंसी जिच्यावर युपिएच्या कार्यकाला दरम्यान बनावट चकमक करण्याचा आरोप आला. चकमकीच्या बाबत योग्य न्यायालयामार्फत निर्णय देण्यात आला. परंतु भारताच्या गुप्तचर एजेंसिज आणि त्यांची क्षमतेला जे नुकसान पोचले आहे त्याची भरपाई केली जाऊ शकत नाही. 4 जून 2013 ला आपल्या लेखात मी लिहिले होते की, “फक्त पाकिस्तान आणि एलईटी यांच्या स्पष्ट असफलतेनंतर ते सफलता मिळवू शकतात. दिल्लीच्या अदूरदर्शी राजकीय प्रशासनाने संस्थांना नुकसान पोचविण्यामागचा अर्थ कळला नाही. गुजरात सरकारला सतवा , मग बेहत्तर त्यासाठी भारताची सुरक्षा प्रणालीला नष्ट करावे लागले तरी चालेल- हा कॉग्रेस पक्षाचा उद्देश स्पष्ट दिसत आहे”.